# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

-----------------------------------------

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०७ जुलै, २०२६ / आषाढ १६, १९४८ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

----------------------------------

### ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्रासाठी लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यास झालेली अटक

**(१) * ३९२०० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील चरई येथील एमटीएनएलच्या इमारतीमधील उपसंचालक कार्यालयात आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी व अन्य गरजूसाठी विहित पुर्तता केल्यानंतर जात प्रमाणपत्रे दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपसंचालक, संशोधन, वर्ग-१ यांनी अर्ज दाखल केलेल्या तक्रारदार यांचेकडून त्यांच्या नस्तीची पुर्तता करण्यासाठी अडीच लाख रुपयांची मागणी केली असल्याचे दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारदाराने लाचलुचपत विभागाकडे केलेल्या तक्रारीनुसार लाचलुचपत पथकाने चरई येथील कार्यालयात सदर उपसंचालक, संशोधन वर्ग-१ यांना रुपये २ लाख ५० हजार इतक्या रक्कमेची लाच घेताना पंचासमक्ष दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भटाडी (जि.चंद्रपूर) खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या कन्व्हेअर बेल्ट परिसरात लागलेली आग

**(२) * ३३१६४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक (जि.चंद्रपूर) वीज केंद्राला भटाडी खाणीतून कोळसा वाहून नेणाऱ्या कोट्यवधी रुपये खर्चाच्या कन्व्हेअर बेल्टखाली दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याचे दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेनंतर वीज केंद्राची अग्निशमन यंत्रणा तब्बल एक तासानंतर घटनास्थळी पोहोचली असून सदर आगीत कन्व्हेअर बेल्टचे नुकसान झाले नसले तरी आग लागण्यामागील कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक समिती किंवा संबंधित अधिकाऱ्यांमार्फत तपास सुरू करण्यात आलेला आहे काय,
(४) असल्यास, चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील विद्यमान अग्निसुरक्षा व आगरोधक यंत्रणेची तत्परता, क्षमता व कार्यक्षमतेबाबत यापूर्वी कोणते सुरक्षा लेखापरीक्षण अथवा तपासणी करण्यात आली आहे काय व संबंधित सुरक्षा लेखापरीक्षणात कोणत्या त्रुटी निदर्शनास आल्या आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कन्व्हेअर बेल्ट परिसरातील अग्निसुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करणे, तात्काळ प्रतिसाद यंत्रणा कार्यान्वित करणे, नियमित सुरक्षा तपासणी करणे तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या पाइप कन्व्हेअर बेल्ट परिसरात आग लागल्याची कुठलीही घटना दिनांक ०५ मे, २०२५ रोजी घडलेली नसून सदर परिसरात अग्नी दुर्घटना दिनांक ५ मे, २०२६ रोजी घडलेली आहे.
(२) सदर अग्नी दुर्घटनेबाबत सूचना प्राप्त होताच, लगेच वीज केंद्राचे अग्निबंब तात्काळ घटनास्थळाकरिता रवाना करण्यात आले होते व ते अग्निशमन केंद्रातील नोंद वहीच्या नोंदींनुसार घटनास्थळी ३२ मिनिटात दाखल झाले होते.

आग लागलेल्या ठिकाणाचे वीज निर्मिती केंद्रातील अग्निशमन केंद्रापासूनचे अंतर, परिसरातील भौगोलिक परिस्थिती, मार्गातील वळणे, अरुंद रस्ते, स्पीड ब्रेकर तसेच इतर वाहतूक विषयक अडचणी विचारात घेता, सदर प्रतिसादकाळ समाधानकारक स्वरूपाचा असल्याचे दिसून येते.

सदर अग्नी दुर्घटना ही पाइप कन्व्हेअर बेल्टच्या परिसरातून उगम पावली नसून, उन्हाळ्याच्या हंगामात परिसरातील नागरिक पावसाळ्यापूर्वी पुढील पिकासाठी शेताची मशागत करण्याच्या उद्देशाने, कुणीतरी अज्ञात व्यक्तीने शेतातील उरलेले पिकांचे अवशेष, गवत व झाडीझुडपे जाळल्यामुळे, सदर आग ही त्यांच्या परिसरातून पाइप कन्व्हेअर बेल्टकडे येत असल्याकारणाने, वीज केंद्राच्या प्रशासनाने सदर कन्व्हेअर बेल्टच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नियंत्रणाकरिता अग्निबंब पाठविले होते व त्याद्वारे आग नियंत्रणात आणण्यात आली होती.

(३) सदर अग्नी दुर्घटना ही पाइप कन्व्हेअर बेल्टच्या परिसरातून उगम पावली नसल्यामुळे, सदर दुर्घटनेबाबत सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक समितीची गरज नाही.
(४), (५) व (६) भटाडी खाण ते पदमापूर दरम्यानच्या पाइप कन्व्हेअर बेल्टच्या अग्नी सुरक्षिततेसाठी विद्यमान विविध अग्निशमन यंत्रणा तथा प्रणालीची व्यवस्था सदर पाइप कन्व्हेअर बेल्टचे दोन्ही लोडींग आणि अनलोडींग पॉईंट येथे कार्यान्वित असून ती पुरेशी व सक्षम आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील माहे नोव्हेंबर,२०२५ मध्ये अंतर्गत अग्नि सुरक्षितता लेखापरीक्षण (Internal Fire Audit) त्याचबरोबर माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सुरक्षितता लेखापरीक्षण झालेले आहे. मात्र, संबंधित लेखापरीक्षणांमध्ये सदर पाईप कन्व्हेअर प्रणालीच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत कोणतीही त्रुटी, उणीव अथवा सुधारणेबाबत उल्लेख केल्याचे आढळत नाही. तसेच, सदर प्रकारच्या घटनांची पाईप कन्व्हेअर बेल्टच्या परिसरात पुनरावृत्ती टाळण्यासाठी, त्या परिसरातील नागरिकांना गवत व पीक अवशेष उघड्यावर न जाळण्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आवश्यक ती जनजागृती करण्यात येईल.

-----------------

## राज्यात अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सद्वारे सुरू असलेल्या प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्याबाबत

**(३) * ३५३७७ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओला, उबेर, रॅपिडो तसेच इतर काही ॲप्सच्या माध्यमातून शासनाची वैध परवानगी व परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता अनधिकृत बाईक टॅक्सी सेवा सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून महिला, विद्यार्थी व अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षेबाबत कोणतीही प्रभावी यंत्रणा उपलब्ध नसल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी परिवहन मंत्री यांनी सायबर क्राईम विभागास तसेच परिवहन आयुक्तांनी संबंधित विभागांना कारवाई संदर्भात पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनधिकृत बाईक टॅक्सी सेवा पुरविणाऱ्या ॲप्स संबंधित कंपन्या व चालकांविरोधात तसेच वैध परवानगीशिवाय प्रवासी वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ च्या तरतुदीनुसार अर्जदाराने खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतुक करता कामा नये व उर्वरित सर्व बाबींची पुर्तता १ महिन्याच्या आत करण्याच्या अटीवर अर्जदार १. मे. उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि. २. रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. ३. मे ॲनी टॅक्नोलॉजीसेस प्रा.लि. यांना ३० दिवसाकरीता मुंबई महानगर क्षेत्राकरीता तात्पुरता परवाना जारी करण्यास राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक १८.०८.२०२५ रोजीच्या बैठकीन्वये मान्यता दिली आहे.

दिनांक ०४.०७.२०२५ रोजी महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ बाबत अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेमध्ये महिला, विद्यार्थी व अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बाईक टॅक्सी चालविणाऱ्या वाहनचालकाकडे मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ३ नुसार बाईक टॅक्सी चालविण्यासाठी अनुज्ञप्ती आणि महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ नुसार अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी जारी केलेले सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे अधिकारपत्र (बॅज) असणे अनिवार्य करण्यात आले आहे. सदर बॅज जारी करतेवळी अर्जदाराची पोलीस विभागाकडून चारित्र्य पडताळणी करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मंत्री (परिवहन) यांनी सायबर पोलीस महाराष्ट्र यांना आणि परिवहन आयुक्त कार्यालयाने अपर पोलीस महासंचालक, सायबर विभाग, मुंबई यांना रॅपिडो, ओला व उबेर या ॲग्रीगेटर कंपन्याकडून चालविण्यात येणाऱ्या बेकायदेशीर दुचाकी प्रवासी वाहतुक सेवा प्रतिबंध करण्यासाठी या कंपनीचे ॲप चे ऑनलॉईन संचालन बंद करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) राज्यातील प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकांद्वारे परवाना नसणाऱ्या बाईक टॅक्सीद्वारे वाहतूक करणाऱ्या वाहनचालकावंर केलेल्या कारवाईचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

माहे एप्रिल, २०२५ ते माहे मार्च, २०२६

| अ.क्र. | दोषी वाहने | अटकावून ठेवलेली वाहने | गुन्हा दाखल केलेल्या FIR संख्या | एकूण दंड वसूली (रु) (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १. | ८१४ | १५१ | १४ | १६.२५ |

माहे एप्रिल, २०२६ व माहे मे, २०२६

| अ.क्र. | दोषी वाहने | अटकावून ठेवलेली वाहने | गुन्हा दाखल केलेल्या FIR संख्या | एकूण दंड वसूली (रु) (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १. | २११ | ६६ | ०० | २.३१ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोकणातील कातळशिल्पे या विषयावर माहितीपट**
**तयार करण्यासाठी मंजूर केलेल्या निधीबाबत**

**(४) * ३३६५६ श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक कातळशिल्पे असून सदर कातळशिल्पांचे स्थळ निरिक्षण करुन स्थानिक लोकांच्या जीवनमानात त्यांचे महत्व, दंतकथा यांचे दस्तावेजीकरण करुन त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा माहितीपट बनविण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने कोकणातील कातळशिल्पे या विषयावर माहितीपट करण्यासाठी शासन निर्णय काढून रुपये १४ कोटी ५० लाख इतक्या खर्चास मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर माहितीपट "युनेस्को" च्या मार्गदर्शक सुचनानुसार व जागतिक दर्जाच्या निकषांनुसार पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या संचालकांची असून सदरचे काम सन २०२९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतचा चित्रपट प्रदर्शित करण्याचा खर्च हा रूपये १० ते १२ कोटी इतका येत असतांना शासनाने मंजूर केलेल्या निधीमध्ये तफावत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे आहे.

कोकणातील रत्नागिरी विभागातील सुमारे ३०० कि.मी. लांब व २५ कि.मी. रुंद क्षेत्रामध्ये २००० पेक्षा जास्त कातळशिल्पे (जिओग्लिप्स) व १५० पेक्षा अधिक कातळशिल्प स्थळे आढळली आहेत. सदरच्या कातळशिल्पांमुळे इतिहासपूर्व समाज व संबंधित मानवसंस्कृतीच्या अमूल्य वारशाची माहिती मिळणे साध्य होणार आहे. प्रत्येक कातळशिल्पाचे वेगवेगळ्या अंतरावरुन, सूक्ष्मदृष्टीने, सर्व ऋतूंमध्ये दृकश्राव्य चित्रीकरण होणे गरजेचे आहे. यानुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. ०८.०४.२०२६ रोजीच्या शासननिर्णयान्वये पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत कातळशिल्पांवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा माहितीपट बनविण्यासाठी येणाऱ्या रु. १४.५० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

कोकणातील कातळशिल्पे या विषयावरचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा माहितीपटाचे अंदाजपत्रक आंतरराष्ट्रीय बाजाराचे सर्वेक्षण करून तयार करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पांतर्गत प्रथमतः सुमारे ४५ मिनिटांचा एक उच्च दर्जाचा सिनेमॅटिक माहितीपट असून यामध्ये एआय च्या माध्यमातून तत्कालीन जीवनशैलीचे दृश्य स्वरुपात पुनर्निर्मिती करण्यात येणार आहे. या सोबतच, युनेस्कोच्या तात्पुरत्या जागतिक वारसा नामांकन यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येकी ०९ स्थळांवर व त्यांच्या बफर क्षेत्रातील स्थळांवर स्वतंत्र ०८ मिनिटांचे लघु माहितीपट, संपूर्ण चित्रिकरण प्रक्रियेचे दस्तऐवजीकरण करणारा एक स्वतंत्र "बिहाइंड द सीन्स" माहितीपट बनविण्यात येणार आहे.

तसेच, सर्व स्थळांच्या संपूर्ण चित्रीकरणाचे रॉ फुटेज, ड्रोनद्वारे घेतलेले हवाई चित्रण, उच्च दर्जाची छायाचित्रे (मुद्रण व संग्रहणास योग्य) यांचा विस्तृत संग्रह संचालनालयाच्या ताब्यात येणार आहे. यासह, सदर प्रकल्पातून निर्मित दृकश्राव्य सामग्रीवर आधारित समाजमाध्यमांसाठी अल्प व दीर्घ स्वरूपातील प्रचारात्मक सामग्री, इन्फोग्राफिक्स व डिजिटल प्रसारासाठी आवश्यक कंटेंट बँक विकसित करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जामोद (जि.बुलढाणा) येथे पोलिसांनी अज्ञात महिलेच्या मृत्यू प्रकरणी निर्दोष व्यक्तींना केलेली अटक

**(५) * ४०१७९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जामोद (जि.बुलढाणा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात महिलेचा अर्धवट जळालेला व शिरच्छेद केलेला मृतदेह मिळाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी तपासाअंती सदर मृतदेह हा शिवानी कलमेकर नामक महिलेचा असल्याचे गृहीत धरून तिच्या वडील व भावास खुनाच्या आरोपाखाली अटक करून न्यायालयासमोर हजर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित शिवानी कलमेकर स्वतः पोलिस ठाण्यात हजर राहिल्याने सदर प्रकरणातील पोलिस तपासामध्ये त्रुटी व निष्काळजीपणा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अपुऱ्या तपासाच्या आधारे निर्दोष व्यक्तींना अटक करून त्यांच्यावर गंभीर गुन्हा दाखल करण्यात आल्यामुळे संबंधित कुटुंबास मानसिक, सामाजिक व आर्थिक त्रास सहन करावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदोष तपास, निष्काळजीपणा व दिरंगाई करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी गंभीर गुन्ह्यांच्या तपासामध्ये ओळख पडताळणी, वैज्ञानिक पुरावे व वरिष्ठस्तरीय देखरेख सक्तीची करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत अज्ञात आरोपीवर दि.२६/०४/२०२६ रोजी अप. क्र. २८३/२०२६ कलम १०३(१), २३८ बि एन एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) सदर गुन्हयाचा समांतर तपास करण्यात येत असतांना स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा यांनी बेपत्ता असलेल्या शिवानी कलमेकर हिचे वडील व भाऊ यांनी तीची हत्या केल्याची कबुली दिल्याने त्यांना पो.स्टे. खकणार, राज्य मध्यप्रदेश येथून ताब्यात घेवून जळगाव जामोद पोलीस स्टेशन, जि. बुलढाणा यांच्या ताब्यात दिले. सदर दोन्ही आरोपींनी दिलेल्या कबुली जबाबाच्या आधारे त्यांना दिनांक १०/०५/२०२६ रोजी ००.३४ वा. अटक करुन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जळगाव जामोद यांचे समोर हजर करण्यात आले.

सदर गुन्हयाचा तपास करत असतांना अनोळखी मृतदेह हा बेपत्ता असलेल्या शिवानी बापुराम कलमेकर यांचा आहे किंवा नाही याची विहीत पध्दतीने खातरजमा न करताच केवळ आरोपी म्हणून पकडलेल्या व्यक्तींच्या जबाबाच्या आधारे त्यांना अटक केल्याचे व कोठडीत ठेवल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, दिनांक २७/०५/२०२६ रोजी पो.स्टे. खकणार, जि.बऱ्हाणपूर, म.प्र. यांनी त्यांचेकडे दाखल झालेल्या मिसिंग तक्रार क्रं ४१/२६ मधील महिला, शिवानी बापुराम कलमेकर या मिळून आल्याबाबतची माहिती पो.स्टे. जळगाव जामोद यांना प्राप्त झाली. त्यानुषंगाने दिनांक २८/०५/२०२६ रोजी बेपत्ता असल्याची नोंद असलेल्या शिवानी बापुराम कलमेकर हिस जळगाव जामोद पोलीस स्टेशन येथे आणुन तिचा जवाब नोंदविला आणि तिची आधारकार्डद्वारे बायोमेट्रिक तपासणी करण्यात येवून ओळख पटवण्यात आली.

त्यामुळे यापूर्वी, तिच्या हत्या प्रकरणी तपासात अटक केलेल्या आरोपींना (शिवानी बापुराम कलमेकर हिचे वडिल व भाऊ) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३०/०५/२०२६ रोजी गुन्हयामधुन बंधमुक्त केले आहे.
(५) सदर प्रकरणाच्या तपासात झालेला हलगर्जीपणा लक्षात घेऊन तातडीने तपासी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना अपर पोलीस अधीक्षक, खामगांव यांच्या दि.२९.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये पोलीस नियंत्रण कक्ष बुलढाणा येथे संलग्न करण्यात आले आहे. तर प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन, जळगाव जामोद यांना पोलीस नियंत्रण कक्ष खामगांव येथे संलग्न करण्यात आले. तसेच या प्रकरणाची, उप विभागीय पोलीस अधिकारी, मेहकर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. या चौकशीत निष्पन्न झाल्यानुसार

या प्रकरणाशी संबंधीत एक पोलीस उप निरीक्षक, एक हेड कॉन्स्टेबल व दोन पोलीस कॉन्स्टेबल यांना दि.०१.०६.२०२६ रोजी निलंबित करण्यात आले व त्यांची प्राथमिक चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, देऊळगांव राजा यांच्याकडे देण्यात आली आहे.

जळगाव जामोदचे तत्कालीन प्रभारी अधिकारी असलेले पोलीस निरीक्षक व स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक यांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी त्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र यांनी दि.०५.०६.२०२६ रोजी सेवेतून निलंबित केले आहे व त्यांची प्राथमिक चौकशी सुरु केली आहे. तर पर्यवेक्षणात कसूर केल्याप्रकरणी उप विभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर यांची दि.२३.०६.२०२६ च्या आदेशान्वये पोलीस उप अधीक्षक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, यवतमाळ या पदावर बदली करण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

१) मृतदेहाची शोधपत्रिका महाराष्ट्रातील सर्व पोलीस घटकांना तसेच मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर, खंडवा, खरगोन जिल्ह्यांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आली व माहिती देणाऱ्या व्यक्तिस रुपये ५०,०००/- बक्षिस जाहीर करण्यात आले.

२) मिसिंग मधील पिडीतांची मृतदेहाशी पडताळणी करण्याकरिता १७ पोलीस पथके निर्माण करण्यात आली असून त्यांच्याकडून अद्यापपर्यंत १३३६७ दाखल मिसिंग प्रोफाईल चेक करण्यात आल्या आहेत. तसेच यामध्ये मिळून आलेल्या ७ संशयित मिसिंग सोबत या मृतदेहाचा DNA जुळून येतो का हे देखील तपासले.

३) सदर अनोळखी मृतदेहाची कवटी सुपर ईंपोजीशन तपासणी करीता सायन हॉस्पीटल, मुंबई येथे पाठविण्यात आली आहे.

४) मृतक महिलेचा फोटो स्पष्टपणे उपलब्ध होणेकरीता तो R.A.I.D.S. पोर्टल प्रणालीवर टाकण्यात येत आहे.

भविष्यात अशा प्रकरच्या घटना टाळण्यासाठी तपासामध्ये ओळख पडताळणी, वैज्ञानिक पुरावे पडताळणी व वरिष्ठस्तरीय देखरेख करण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यामधील मार्गदर्शक सुचनांची काटकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सूचना सर्व संबंधित घटकांना देण्यात आल्या आहेत. तसेच सदर प्रकरणी तपासातील हलगर्जीपणाबाबत चौकशी करण्यात येऊन त्यामधील अहवालानुसार संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यावर उचित कारवाई करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परराज्यात नोंदणी करणाऱ्या वाहनांमुळे राज्याचा महसूल बुडत असल्याबाबत

**(६)** * **३४९६६ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्ते कर (Road Tax) प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याने विशेषतः आलिशान गाड्यांची नोंदणी शेजारील केंद्रशासित प्रदेश असलेल्या दादरा-नगर हवेली येथे करून करचोरी केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई, पुणे, ठाणे आणि अहिल्यानगर यांसारख्या शहरांतील अनेक महागडी वाहने ‘DN-०९’ नोंदणीवर वर्षानुवर्षे राज्यात असूनही त्यांचा रस्ते कर मिळत नसल्याने मोटार वाहन कायद्यातील नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परराज्यातील वाहन राज्यात १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ राहिल्यास त्याची नोंदणी राज्यात करणे अनिवार्य असतानाही, आर.टी.ओ. विभागाच्या नियोजनाअभावी व तपासणी नाक्यांवरील दुर्लक्षामुळे दरवर्षी राज्याचे शेकडो कोटी महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, परराज्यातील नोंदणी असलेल्या वाहनांमुळे राज्याचा अधिकृत महसूल बुडत असून, या बेकायदा कृतीमुळे कर भरणाऱ्या प्रामाणिक वाहनधारकांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने करचोरी करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासह कराच्या संरचनेत (Tax Structure) सुसूत्रता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांना सद्य:स्थितीत कर माफी आहे. महाराष्ट्र राज्यालगतच्या काही राज्यांमध्ये मोटार वाहन कराचे प्रमाण थोडे कमी आहे. परंतु, यामुळे महाराष्ट्रात होणाऱ्या वाहनांच्या नोंदणीवर याचा परिणाम झाल्याचे दिसून येत नाही.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील तरतूदीनुसार एका राज्यात नोंदणी झालेले वाहन दुसऱ्या राज्यात एका वर्षापेक्षा जास्त वापरण्यात येणार असेल तर सदर वाहनांचे क्रमांक बदलणे आवश्यक असून त्या राज्याचा करभरणा करणे बंधनकारक आहे. सदर तरतूद तात्पुरत्या कालावधीकरिता येणाऱ्या वाहनांना लागू नाही. परिवहन विभागामार्फत अशा प्रकारच्या वाहनांवर नियमित कारवाई करण्यात येते.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), मुंबई (पूर्व), मुंबई (पश्चिम), बोरीवली व ठाणे या कार्यालयांमध्ये एकूण ७९६० इतक्या इतर राज्यातील वाहनांची नोंदणी झाली आहे.

परिवहन आयुक्त यांच्या दिनांक ०१.०६.२०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार खाजगी वाहनधारकाने वाहन महाराष्ट्र राज्यात आणतेवेळी संबंधित सीमा तपासणी नाक्यावर वा लगतच्या परिवहन कार्यालयात नमुना एफटी अन्वये घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर नमुन्यामधील घोषणापत्र सादर केल्यानंतर अशी वाहने अर्जदाराने महाराष्ट्र राज्यात वापरासाठी घोषित केलेल्या कालावधीच्या जास्तीत जास्त पहिल्या त्रैमासिक कालावधीकरिता कर माफीसाठी पात्र ठरतात. त्यानंतर महाराष्ट्र राज्यात आलेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक वर्ष कालावधीपर्यंतचा कर वसूल करणे क्रमप्राप्त आहे. सदर एक वर्षाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्याचा देय वाहनकर भरल्यानंतर असे वाहन महाराष्ट्र राज्यात कितीही वेळा ये जा करु शकते.

-----------------

## राज्यात विशेषत: पुण्यात पॉक्सो अंतर्गत न्याय प्रक्रियेला वेग देण्याकरिता विशेष न्यायालयांची संख्या वाढविण्याबाबत

**(७) * ३५४६६ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लहान मुलांवरील बलात्कार, लैंगिक शोषण आणि विनयभंगासारखे गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगारांवर कडक शिक्षेची तरतूद असलेला लहान बालकांना संरक्षण देणारा पॉक्सो कायदा केंद्र शासनाच्या वतीने लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात साक्षी पुरावे, वैद्यकीय अहवाल, पीडितांचे जबाब, आरोपींची बाजू आणि न्यायालयीन प्रक्रियेतील टप्पे, न्यायालयांवरील वाढता ताण, अपुरे मनुष्यबळ, वाढती प्रकरणे व न्यायालयांची मर्यादित संख्या इत्यादींमुळे खटल्यांची सुनावणी दीर्घकाळ लांबत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील जिल्हा व सत्र न्यायालयात पॉक्सो अंतर्गत ४६६० खटले प्रलंबित असून उर्वरित ०६ न्यायालयात १८७७ प्रकरणे प्रलंबित असताना वर्षानुवर्षे प्रलंबित खटल्यामुळे पीडित बालकांना व त्याच्या कुटुंबियांना न्यायाची प्रतिक्षा करावी लागत असल्याने मानसिक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरात ४००० हून अधिक खटले प्रलंबित असल्याने न्यायालयांची मर्यादित संख्या आणि अपुरे मनुष्यबळ व्यवस्थेमुळे सुनावणीचा वेग कमी पडत असल्याने विशेष न्यायालयांची संख्या वाढून अभियोजन आणि पोलीस तपास अधिक सक्षम करून बालकांना समुपदेशन आणि कायदेशीर मदत वेळेत मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

पुणे शहरामध्ये पोक्सो अंतर्गत ३५५८ खटले प्रलंबित असून या खटल्यांपैकी ६ पोक्सो विशेष न्यायालयात २८०३ खटले प्रलंबित आहेत.

विधि व न्याय विभागाच्या दि.२७.०८.२०१४ च्या अधिसूचनेन्वये सर्व सत्र न्यायालयातील सत्र न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश व तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधीश या सर्वांना पोक्सो कायद्यांतर्गत खटले चालविण्यासाठी विशेष न्यायाधीश म्हणून अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार उर्वरित ७५५ खटले हे पुणे शहरातील एकूण २८ जिल्हा न्यायाधीश व ३ तदर्थ जिल्हा न्यायाधीश (यापैकी ६ विशेष जलदगती न्यायालये वगळून) यांच्या न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत.

(४) “National Mission for Safety of Women” अंतर्गत शासन निर्णय दि.०४.०३.२०२० अन्वये महिलांवरील बलात्काराची व पोक्सो कायद्यांतर्गत बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे चालविण्याकरिता १०८ विशेष जलदगती न्यायालये आणि पोक्सो कायद्यांतर्गत ३० विशेष जलदगती न्यायालये अशी एकूण १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये पुणे मुख्यालयात एक विशेष पोक्सो न्यायालय व ११ विशेष जलदगती न्यायालये, बारामती येथे २ विशेष जलदगती न्यायालये आणि खेड येथे २ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शासन अधिसूचना दि. १३.०५.२०२६ अन्वये, महिला आणि बालकांशी संबंधित अत्याचाराची व ‘पोक्सो’ कायद्यांतर्गतच्या खटल्यांची सुनावणी व निपटारा जलदगतीने करण्यासाठी ५८ जिल्हा न्यायाधीशांची विशेष जलदगती न्यायालये किंवा पोक्सो न्यायालये कार्यान्वित करण्यात आली आहेत. यामध्ये पुणे मुख्यालय येथील ६ आणि बारामती व खेड येथील प्रत्येकी एका विशेष जलदगती न्यायालयाचा समावेश आहे.

राज्यातील मंजूर इतर विशेष जलदगती न्यायालये कार्यान्वित करण्याकरिता, जिल्हा न्यायाधीशांची निवड आणि नियुक्ती करण्याची भरती प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाकडून प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील रिजॉईस इंटरनॅशनल स्कूलमध्ये धर्मांतर करण्याचा प्रकार सुरु असल्याबाबत

**(८) * ३५५५७ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील रिजॉईस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित एका कार्यक्रमादरम्यान धर्मांतरणाची घटना माहे मे, २०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेच्या ५ व्या मजल्यावर दिनांक १० मे, २०२६ रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन केले असताना या कार्यक्रमात काही लोकांच्या डोक्यावर हात ठेवून आजार बरे करण्याचा आव आणत हिंदू देवदेवतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून ख्रिश्चन धर्माप्रती आकर्षित करण्याचा तसेच दर रविवारी या शाळेत असे कार्यक्रम आयोजित करून धर्मांतरणाचा प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अशा घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी घटना पोलीस तपासादरम्यान निदर्शनास आली नाही.
(२) व (३) मालाड पश्चिम (मुंबई) येथील रिजॉईस इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिनांक १० मे, २०२६ रोजी एका प्रार्थनेच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमात हिंदु देवदेवतांबद्दल कोणतेही आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झालेले नाही. तथापि, तक्रारदार यांना त्यांच्या घरामध्ये देवदेवतांचे फोटो ठेवत जाऊ नका असे सांगून तक्रारदार यांच्या धार्मिक भावना दुखावल्याचे पोलीस तपासात निदर्शनास आले आहे.

तसेच, सदर ठिकाणी प्रार्थनेकरिता उपस्थित असलेल्या साक्षीदारांचे जबाब घेतले असता, प्रार्थनेचा आयोजक तथा आरोपी हा, तेथे जमलेल्या लोकांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांचे आजार व दु:ख बरे करतो असा चमत्कार तो करत असल्याचे लोकांना भासवुन त्यांची फसवणूक करत असल्याची बाब पोलीस तपासादरम्यान निदर्शनास आली आहे.

त्यामुळे, सदर कार्यक्रम तथा प्रार्थनेकरिता जमलेल्या लोकांमध्ये अंधश्रध्दा पसरवित असल्याची बाब पोलीसांच्या निदर्शनास आल्याने सदर प्रकरणी मालाड पोलीस ठाणे येथे कलम २९९, ३(५) भा.न्या.सं. सह कलम ३ (२) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा इत्यादींना प्रतिबंध करणेबाबत कायदा २०१३ अन्वये गु.र.क्र. ७७०/२०२६ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

याशिवाय, पोलीस तपासादरम्यान सदर ठिकाणी प्रार्थनेकरिता उपस्थित असलेल्या एकूण ०९ इसमांचे/महिलांचे/साक्षीदारांचे जबाब नोंद करण्यात आले आहेत. सदर जबाबात ते स्वतः हिंदु धर्मिय असुन त्यांचे कोणत्याही प्रकारचे धर्म परिवर्तन करण्यात आलेले नसून ते आज देखील हिंदुच असल्याचे त्यांनी त्यांचे जबाबामध्ये सांगितले आहे. तसेच, प्रार्थनेचे आयोजक /आरोपी हा स्वतः हिंदु असुन त्याने देखील अद्यापपर्यंत ख्रिश्चन धर्म स्विकारलेला नसल्याचे पोलिस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात राज्य परिवहन महामंडळात एन.सी.एम.सी. कार्ड वितरण प्रक्रियेत दलांलांकडून गैरव्यहार होत असल्याबाबत

**(९) * ३३८१२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य परिवहन महामंडळाने रोख व्यवहाराला पर्याय म्हणून तसेच सवलतधारक प्रवासी, सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी आदी लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड (एन.सी.एम.सी.) बंधनकारक/सक्तीचे केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात एन.सी.एम.सी. कार्ड तयार करून देणाऱ्या नियुक्त दलालाकडून निर्धारित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारण्यात आल्याने आर्थिक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एन.सी.एम.सी कार्ड वितरण प्रक्रियेत सांगली जिल्ह्यात नोंदणी करूनही लाभार्थ्यांना निर्धारित कालावधीत कार्ड उपलब्ध झाले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दलाल, दोषी अधिकारी अथवा इतर जबाबदार व्यक्तींविरुद्ध प्रवाशांनी संबंधित आगार प्रमुख अथवा महामंडळाकडे तक्रार केल्याचे तसेच कार्ड वितरण प्रक्रिया सुरळीत व गतिमान करण्याची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या मोफत प्रवास पास सुविधेचा लाभ घेण्यासाठी एन.सी.एम.सी. कार्ड आवश्यक करण्यात आले आहे काय आणि संबंधित लाभार्थ्यांना कार्ड वेळेत उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर एजंट हे कार्डचे रजिस्टेशन करीता रु.२२०/- घेत असल्याबाबत बसस्थानकावरील कार्ड नोंदणी करणाऱ्या प्रवाशांनी आगार प्रमुख यांच्याकडे तोंडी तक्रार दिली. सदरचा एजंट हा रा.प.कार्डधारकाकडून रु.२१/- जादा शुल्क वसुल करत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर एजंटचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

रा.प.महामंडळातील सांगली विभागामध्ये प्राप्त तक्रारीनुसार संबंधित एजंटचा परवाना सेवा पुरवठादाराद्वारे रद्द करण्यात येत आहे. तसेच मे. इबिक्स टेक्नोलॉजिस लि. यांचेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या अधिकृत एजंटद्वारे नोंदणीकरण केंद्र बंद ठेवल्यामुळे रु.५०,०००/- तसेच नोंदणीकरण करण्यात आलेली कार्ड विहित वेळेत लाभार्थ्यांस वितरीत न केल्यामुळे मे. इबिक्स टेक्नोलॉजिस लि. यांस रु.१,००,०००/- दंड करण्यात आला आहे.
(५) व (६) रा.प.महामंडळाचे परिपत्रक दिनांक २७.०५.२०२६ अन्वये रा.प. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत प्रवास पासावर एन.सी.एम.सी.कार्ड माहे-जुलै, २०२६ पासून बंधनकारक केलेल्या सूचनेस पुढील सुधारीत सूचना प्रसारीत होईपर्यत मुदत वाढ देण्यात आली आहे. तसेच एन.सी.एम.सी. कार्ड तयार होईपर्यत पुर्वीप्रमाणे कागदी पासावर प्रवास करण्याची मुभा देण्यात आली आहे.

-----------------

## मौजे टिवरी (ता.वसई, जि.पालघर) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीचा झालेला गैरव्यवहार

**(१०) * ३७५८४ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (पूर्व) मौजे टिवरी (ता.वसई, जि.पालघर) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे सुमारे ६५ एकर जमिनीचा रुपये १००० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून याप्रकरणी नायगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात तत्कालीन दुय्यम निबंधक (Sub-registrar), तहसीलदार आणि तलाठी यांनी शासकीय नियमांचे उल्लंघन करून भूमाफियांना मदत केल्याचे पोलीस तक्रारीत नमूद असून दोषी अधिकाऱ्यांवर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महसूल कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासाठी शासनाने विशेष चौकशी समिती (SIT) स्थापन करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह बनावट नोंदी झालेल्या जमिनींचे सात-बारा उतारे पुन्हा मूळ मालकाच्या नावे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धनश्री डेव्हलपर्सचे संचालक श्री. शंकरराव बोरकर व त्यांचा मुलगा यांच्या मालकीच्या नायगांव (पूर्व) मौजे टिवरी, ता.वसई जिल्हा पालघर येथील एकूण ६५.३३ गुंठे एकर जमीनीच्या बनावट पॉवर ऑफ अॅटर्नी बनवून ती खरी असल्याचे भासवून आरोपीने सदर जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत स्वतःच्या तसेच इतर ०२ कंपन्याच्या नावे केले. सदर खरेदी प्रक्रिया निबंधक नोंदणी कार्यालय, वसई-२, वसई पश्चिम, जिल्हा पालघर येथे खोटी माहिती देवून करण्यात आली आहे. याप्रकरणी श्री. शंकरराव बोरकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नायगाव पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे दि.०४.०२.२०२६ रोजी गु. र. क्र.१२७/२०२६ बी.एन.एस.एस. कलम ३१८(४), ३१६(५), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(१), ३३९, ३(५) अन्वये ०४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणात तत्कालीन तहसिलदार व तलाठी यांनी महसूली नियमाचे उल्लंघन केलेले नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांच्या दि.२८.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. पोलीस स्टेशनमार्फत संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या सहभागाबाबत तपास सुरु आहे.
(३) सदर गुन्ह्यातील आरोपींनी संगनमताने बनावट पॉवर ऑफ अॅटर्नी बनवून ती खरी असल्याचे भासवून सदर व्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात ०४ आरोपी निष्पन्न झाले असून ०२ अटक आरोपी सध्या मा. सत्र न्यायालयाच्या आदेशान्वये जामीनावर मुक्त आहेत. उर्वरीत ०२ आरोपींपैकी एका आरोपीने मा. उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला आहे व एका आरोपीचा शोध सुरु आहे.

याप्रकरणी विद्यमान महसूल अधिकाऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले असून तत्कालीन महसूल अधिकारी यांच्या सहभागाबद्दल तपास सुरु आहे. सदर घटना सन २०१२ च्या सुमाराची असल्याने तत्कालीन अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत किंवा त्यांची बदली झाल्यामुळे त्यांना तपासासाठी उपस्थित राहण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यासंदर्भात नोंदणी कार्यालयातील विद्यमान अधिकाऱ्यांचे जबाब नोंद करण्यात आलेले आहेत.

श्री.शंकरराव बोरकर यांनी श्री.हेमंत पाटील यांच्याविरुध्द मा. दिवाणी न्यायाधिश (व-स्तर), वसई येथे स्पे.मु.नं. ७३/२०२६ अन्वये दाखल केलेल्या दाव्यामध्ये दि.१६/०४/२०२६ रोजी तडजोडनामा झाला आहे. मा. दिवाणी न्यायाधिश (व-स्तर) यांनी सदर तडजोडनामा मान्य केला आहे. फेरफार क्र. १००६, दि. ०८/०५/२०२६ नुसार तहसिलदार, वसई यांच्या दि.१६/०४/२०२६ अन्वये मा. दिवाणी न्यायालयातील तडजोडनाम्यानुसार मौजे टिवरी येथील फेरफार क्र. ८५९ व ९३३ रद्द केल्याचे दिसून येते. तसेच दुय्यम निबंधक, वसई २ यांचेकडील दस्त क्र. ४४४१/२००८, दि. ०१/०९/२००८ व २९४७/२०१३, दि.३०.०३.२०१३ हे दस्त रद्द करण्याचे वादी व प्रतिवादी यांनी मान्य केलेनुसार श्री. हेमंत पाटील यांचे नाव कमी करुन श्री.शंकरराव बोरकर यांचे नाव दाखल करण्यात आले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांच्या दि.२८.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये

कळविण्यात आले आहे. तपासाअंती तत्कालिन अधिकाऱ्यांचा सहभाग निष्पन्न झाल्यास संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकांमध्ये ई-सिगारेटचा वापर वाढत असल्याबाबत

**(११) * ४०७१० श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मानवी आरोग्यास अत्यंत घातक असलेल्या ई-सिगारेट (व्हेप) चा वापर विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकांमध्ये वाढत असल्याचे निदर्शनास आले असून ई-सिगारेटच्या उत्पादन, विक्री व वितरणावर कायद्याने बंदी असतानाही राज्यात गुप्तपणे व्यापार सुरू असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात गेल्या तीन वर्षांत ई-सिगारेटच्या विक्री, साठवणूक व वितरणाविरोधात कारवाई करून किती प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, महाविद्यालयीन परिसर, शहरी भाग तसेच ऑनलाइन माध्यमांतून युवकांना ई-सिगारेट सहज उपलब्ध होत असून त्याच्या वापरामुळे युवकांमध्ये निकोटीनचे व्यसन, श्वसनाचे आजार व इतर आरोग्यविषयक समस्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या परिसरात ई-सिगारेटची विक्री रोखणे, युवकांमध्ये जनजागृती करणे, ऑनलाइन विक्रीवर नियंत्रण आणणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासनाने इलेक्ट्रॉनिक सिगारेट (उत्पादन, विनिर्माण, आयात, निर्यात, परिवहन, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) प्रतिबंध अधिनियम, २०१९ हा अधिनियम पारित करून दिनांक १८.०९.२०१९ रोजीपासून ई-सिगारेटवर बंदी घातली आहे. सदर अधिनियमान्वये ई-सिगारेटच्या उत्पादन, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठवणुक व जाहिरातीवर बंदी घातलेली आहे.

तथापि, अवैधरित्या वापरल्या जाणाऱ्या ई-सिगारेटबाबत राज्यात सन २०२३ मध्ये १२१ गुन्हे, सन २०२४ मध्ये ८२ गुन्हे, सन २०२५ मध्ये ११९ गुन्हे व सन २०२६ (मे अखेर) मध्ये ११२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत उपाययोजना म्हणून पोलीस दिदी, पोलीस अधिकारी तसेच व्यसनमुक्ती संस्था यांचेमार्फत शाळा व महाविद्यालयात प्रत्यक्ष भेटी देऊन विद्यार्थ्यांना ई-सिगारेटच्या व्यसनाचे दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात येते. मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, आईज ॲण्ड इअर यांचेमार्फत ई-सिगारेटच्या विक्रीवर लक्ष ठेवण्यात येते.
तसेच, इलेक्ट्रॉनिक सिगारेट (उत्पादन, विनिर्माण, आयात, निर्यात, परिवहन, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) प्रतिबंध अधिनियम, २०१९ या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना वेळोवेळी सूचना देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमध्ये रेशन, कॅन्टीन व विविध वस्तूंच्या खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ३९३४८ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कारागृहांमध्ये रेशन, कॅन्टीन व विविध वस्तूंची खरेदी गेल्या चार वर्षापासून एकाधिकारशाही पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवून सन २०२२ पासून ठराविक ठेकेदारांनाच कंत्राट दिले जात असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संघटनेने मुख्य सचिव आणि गृह सचिवांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारागृहातील कैद्यांना निकृष्ट दर्जाच्या वस्तू पुरवल्या जात असून गव्हर्नमेंटच्या इमार्केटले पोर्टलद्वारे झालेल्या खरेदीतही गैरव्यवहार झाला असल्याच्या तक्रारी गृह विभागाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाजारभावापेक्षा कारागृहात अव्वाच्या सव्वा कांदा, टोमॅटो, केळी, बटाटा, लसूण आणि साखर खरेदी करण्यात आले असून महिला बचत गटांना दुर्लक्षित करून विशिष्ट दलालामार्फत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने कैद्यांना निकृष्ट दर्जाच्या वस्तू पुरवल्या गेल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह कारागृहातील कैद्यांना चांगल्या प्रतीच्या वस्तू पुरविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गृह विभागाच्या दि.०६.०१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये, बंद्यांकरीता आवश्यक रेशन व कॅन्टीन वस्तुंचे १४ गटांत वर्गीकरण केले होते. त्यानुसार, सन २०२२ ते २०२४ कालावधीसाठी कारागृह उपमहानिरीक्षक स्तरावर कारागृहनिहाय निविदा राबविण्यात येत होत्या.

त्यानंतर गृह विभागाच्या दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये, विभागनिहाय ३ गटांमध्ये व केंद्रीय पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर निविदेसंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व निविदेतील अपात्र संस्थांनी मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. परंतु, मा.न्यायालयांनी त्या याचिका फेटाळल्या आहेत.
(२) कैद्यांना पुरविल्या जाणाऱ्या वस्तु निकृष्ट दर्जाच्या नाहीत. मात्र, रेशन वस्तु खरेदीसाठी महाटेंडर पोर्टलवर राबविण्यात आलेल्या निविदांबाबत, अपात्र निविदाकार संस्थांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात १३३११/२०२४ व १४३४३/२०२४ या रिट याचिका दाखल केल्या होत्या. सदर निविदा प्रक्रिया विहित कार्यपध्दतीने राबविण्यात आल्यामुळे, मा.उच्च न्यायालयाने निविदा प्रक्रिया वैध ठरवून, याचिका फेटाळल्या. त्यामधील रिट याचिका क्र.१४३४३/२०२४ मधील निर्णयाविरोधात "मारिया महिला बचत गटाने" दाखल केलेली विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने देखील फेटाळली. त्यामुळे निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.
(३) कारागृहांना पुरवठा केलेल्या वस्तुंमध्ये कांदा, टोमॅटो, केळी, बटाटा, लसूण आणि साखर इत्यादीचा समावेश असून, पात्र पुरवठादारांनी सदर वस्तु सरासरी बाजार दरानेच पुरविल्या आहेत. सन २०२४ ते २०२६ या कालावधीच्या रेशन निविदेत "मारिया महिला बचत गट" या संस्थेने सहभाग घेतला होता, मात्र, निविदा प्रक्रियेत ते अपात्र ठरले.
(४) कारागृहासाठी रेशन वस्तु पुरवठ्याच्या निविदा प्रक्रियेच्या संदर्भातील दाखल रिट याचिकांमध्ये मा.न्यायालयांनी निविदा प्रक्रिया योग्य असल्याचे नमूद करुन, याचिका फेटाळल्या आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच कारागृहातील कैद्यांना चांगल्या प्रतीच्या वस्तू पुरविण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) गृह विभागाच्या दि.१९.०६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये, गठीत केलेल्या "आहार व स्वच्छता समिती" मार्फत कारागृहाची तपासणी करण्यात येते.

२) गृह विभागाच्या दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये, निविदा पध्दतीत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, चांगल्या प्रतिच्या वस्तू पुरविण्याकरिता FSSAI च्या मानकानुसार खाद्यवस्तुंचे विनिर्देश विहित करुन निविदा राबविण्यात आल्या आहेत.

३) कारागृह स्तरावर वस्तू प्राप्त झाल्यावर, अधिक्षकांमार्फत वस्तुंची तपासणी करून, त्या स्वीकारण्यात येतात.

४) अभिविक्षक मंडळामार्फत कारागृहांची तपासणी करण्यात येते.

५) कारागृह अधिक्षक स्तरावर गुणवत्ता तपासणीसाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत आहार, पाणी व स्वच्छता यांची तपासणी केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विद्यार्थ्यांनी 'नीट' परीक्षा पेपरफुटीमुळे केलेल्या आत्महत्या

**(१३) * ३९००७ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये नीट (NEET) परीक्षेतील पेपर फुटीचा मानसिक ताणतणाव वाढला असून लातूर जिल्ह्यात कु.मैथिली सोनवणे या १८ वर्षीय गुणवंत विद्यार्थिनीने 'नीट' पेपरफुटीचा मानसिक धक्का व नैराश्यापोटी दिनांक १६ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान गळफास लावून आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी 'नीट'च्या वाढत्या दबावामुळे वाशिमचा ऋषिकेश वायभासे, लातूरचा अभिषेक भुतडा आणि नांदेडचा कृष्णा बेदरे यांसारख्या अनेक होतकरू विद्यार्थ्यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृत मैथिलीच्या पालकांनी जबाबात 'नीट पेपरफुटीचा तणाव' हेच आत्महत्येचे कारण सांगूनही पोलिसांनी मूळ रॅकेटचा सखोल तपास न करता केवळ अकस्मात मृत्यूची प्राथमिक नोंद केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'नीट' गैरव्यवहाराचे मुख्य धागेदोरे राज्यातील लातूर व इतर जिल्ह्यांपर्यंत पोहोचल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले असून, या परीक्षा घोटाळ्यांमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य उद्‌ध्वस्त होऊन त्यांच्यात तीव्र अगतिकता पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यासह स्पर्धा परीक्षांच्या या जीवघेण्या मानसिक दबावातून व व्यवस्थापकीय गैरव्यवहारातून विद्यार्थ्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'विशेष समुपदेशन केंद्र' व 'हेल्पलाईन' सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कु. मैथिली सोनवणे या विद्यार्थिनीने इयत्ता १२ वीच्या परिक्षेत कमी गुण मिळाल्याने आत्महत्या केली असल्याचे तिच्या नातेवाईकांनी जबाबामध्ये सांगितले आहे.

(२) वाशिमचा ऋषिकेश वायभासे, लातूरचा अभिषेक भुतडा व नांदेडचा कृष्णा बेदरे यांनी आत्महत्या केल्याची पोलीस अभिलेख्यात नोंद झालेली नाही. तथापि, नागपूर शहर येथील आकांक्षा उर्फ स्नेहा चतुर्वेदी हीने नीट चा पेपर रद्द झाल्यामुळे दि. २०.०५.२०२६ रोजी तर, परभणी येथील प्रथमेश राठोड याने नीट परिक्षा उत्तीर्ण होतो की नाही याचा धसका घेऊन दि. २८.०५.२०२६ रोजी आत्महत्या केली आहे.

(३) हे खरे नाही. मृत मैथिलीच्या पालकांनी दिलेल्या जबाबामध्ये मैथिलीने नीट पेपरफुटीच्या तणावातून आत्महत्या केली नसून, १२ वीच्या परिक्षेत कमी गुण मिळाल्याने आत्महत्या केली असल्याबाबत सांगीतले आहे.

(४) नीट यूजी-२०२६ च्या परिक्षेत जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्राचे प्रश्न एका संशयास्पद गेस पेपरशी तंतोतंत जुळत असल्याच्या प्रकारामध्ये CBI नवी दिल्ली येथे गुन्हा क्र.RC२२१२०२६E०००१० दाखल केला आहे. CBI पथकाने लातूर जिल्ह्यातील नीट यूजी-२०२६ च्या परिक्षेत रसायनशास्त्रचा पेपर सेट करणारे प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, आरसीसी खाजगी शिकवणीचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर व डॉ. मनोज शिरूरे यांना अटक करून त्यांची पोलीस कस्टडी घेवून तपास केला आहे.

तसेच पुणे शहरातून महिला आरोपी नामे मनिषा संजय वाघमारे, रा.बिबवेवाडी, हिला पुणे शहर पोलीसांनी ताब्यात घेऊन सिबीआय पथकाकडे पुढील तपासकामी देण्यात आले. आरोपी नामे धनंजय निवृत्ती लोखंडे रा. वाघोली यास अहिल्यानगर येथे ताब्यात घेवून सिबीआय पथकाकडे सुपूर्द केले आहे. त्याचप्रमाणे पुणे शहरातून सिबीआय पथकाने आरोपी नामे मनिषा हवालदार व मनिषा मांढरे यांना गुन्ह्याच्या तपासकामी अटक केली आहे. नाशिक येथील शुभम मधुकर खैरनार यास नाशिक शहर पोलीसांनी ताब्यात घेवुन पुढील तपासकामी सिबीआय पथकाकडे सुपुर्द केले आहे.

(५) सदर प्रकरणी CBI नवी दिल्ली येथे गुन्हा क्र. RC२२१२०२६E०००१०, CBI प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास सुरू आहे.

नीट परीक्षा केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA), नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येते.

नीट पुनर्परीक्षा दि.२१.०६.२०२६ रोजी सुरळीतपणे पार पडली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात फेसलेस शिकाऊ अनुज्ञप्ती अनधिकृत पध्दतीने होत असल्याबाबत

**(१४) * ३८२९९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात ऑनलाईन शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स) प्रणालीमध्ये ब्राउझरमधील डेव्हलपर टुल्सच्या सहाय्याने जावा कोडमध्ये फेरफार करुन फोटो पडताळणीसारखी महत्वाची सुरक्षा प्रक्रिया डावलून केवळ पाच ते दहा हजार रुपयांस अर्जदार प्रत्यक्ष उपस्थित नसतांना बनावट फोटो वापरून शिकाऊ परवाना देण्यात येत असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीच्या पध्दतीने परवाना मिळविल्याने प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण होऊन, अपघाताच्या संख्येत वाढ झाली असून शिकाऊ परवाना मिळाल्यानंतर ४ महिन्यात कायमस्वरुपी परवाना मिळवून त्याआधारे मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड, पासपोर्ट किंवा मोबाईल सीम मिळविण्यासाठी दलाल

बांग्लादेशींना या प्रणालीद्वारे मदत करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जनतेच्या संरक्षणासाठी शिकाऊ परवाना देण्याच्या प्रक्रियेतील त्रुटी दूर करुन व चालकांच्या उपस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करुन या प्रक्रियेत कठोर नियम बनवून योग्य व्यक्तीस परवाना वितरीत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्यात फेसलेस शिकाऊ अनुज्ञप्ती अनधिकृत पद्धतीने प्राप्त केल्याची तक्रार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांचेकडून परिवहन आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आली होती. सदर प्रकरणामध्ये दलालामार्फत बनावट वेबसाईटद्वारे परिवहन विभागाच्या सारथी पोर्टलद्वारे परिक्षा प्रक्रियेत फसवणूक करुन ठराविक IP Address वरुन शिकाऊ अनुज्ञप्ती मिळविल्याचे निदर्शनास आले आहे.

उमेदवाराशिवाय लर्निंग लायसन्स मिळण्याच्या गैरप्रकाराबाबत पोलीस ठाणे सायबर, जि. जालना येथे दिनांक २६.११.२०२५ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदर तक्रारीनुसार सायबर गुन्हे शाखेत गुन्हा क्रमांक २३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२), माहिती तंत्रज्ञान अधिनियम सहकलम ४३ (ए), ४३ (बी), ४३ (एच), ६६ (सी), ६६ (डी), ७२, ७२ (ए), मोटार वाहन अधिनियम चे कलम ३, ४, ७, केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करणाऱ्या प्रणालीमध्ये आवश्यक सुरक्षात्मक बदल करण्याबाबत राष्ट्रीय सूचना केंद्र (NIC) यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार, शिकाऊ अनुज्ञप्ती प्रणालीमध्ये सुधारणा केल्याबाबत तसेच सारथी प्रणालीचे सुरक्षा ऑडीट केल्याबाबत NIC ने कळविले आहे. NIC च्या सारथी टीमने शिकाऊ अनुज्ञप्ती प्रणालीमध्ये सुरक्षात्मक बदल केले आहेत व शिकाऊ अनुज्ञप्ती देण्याचे कामकाज सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुराधा नागरी सहकारी बँक मर्यादित, चिखली (जि. बुलढाणा) या बँकेत कर्ज वाटपाच्या रक्कमेत झालेला गैरव्यवहार

**(१५) * ४१०२१ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेतंर्गत अनुराधा नागरी सहकारी बँक मर्यादित, चिखली (जि.बुलढाणा) या बँकेने कर्ज वाटप केले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकेने वैयक्तिक कर्ज वितरित करताना व्यवसाय स्थापन होत असल्याची खातरजमा न करता जवळच्या अपात्र लोकांना कर्ज वाटप केले असून याप्रकरणी उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीच्या अहवालामध्ये वाटप केलेल्या कर्जापैकी किमान ७०% व्यवसाय बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाटप केलेल्या कर्ज रकमेतून कोणतीही यंत्रसामग्री विकत घेतली नसून व्यवसाय सुरू करताना किमान वस्तू सेवा कर नोंदणी क्रमांक असणे आवश्यक असताना ९५% कर्जदारांकडे वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्यादित, चिखली (जि.बुलढाणा) या बँकेच्या सन २००७-२००८ च्या लेखापरीक्षण अहवालानुसार पीक कर्जाची थकीत रक्कम २.१० लक्ष रुपये तर शेती कर्जाची थकीत रक्कम ८.५४ लक्ष रुपये असून पीक कर्ज व शेती कर्जाची एकूण थकबाकी केवळ रुपये १०,६४,००० असताना १७२२ शेतकऱ्यांचे थकीत नसलेले कर्ज थकीत दाखवून केंद्र व राज्य शासनाकडून सन २००८ च्या कर्जमाफी योजनेंतर्गत रुपये २,३५,०९,७१५ एवढी रक्कम कर्जमाफीसाठी प्राप्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर बँकेने कर्जमाफीची प्राप्त रक्कम शेतकऱ्यांना वितरित न करता रुपये २,२४,४५,७१५ एवढया रक्कमेचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त कर्जमाफी घोटाळ्यातील दोषी संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करून अपहारातील रक्कमेची १८% दंडनीय व्याजासह वसुली करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्या दरम्यान प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह गैरव्यवहारातील रक्कम वसुल करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीच्या अहवालानुसार महामंडळामार्फत व्याज परतावा घेत असलेल्या बुलढाणा व चिखली तालुक्यातील एकूण ४०० कर्ज प्रकरणांपैकी १३२ व्यवसाय बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) अंशतः खरे आहे,
(४) व (५) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांनी दि. २२/०६/२०२० रोजीच्या आदेशाद्वारे नियुक्त केलेल्या चौकशी समितीने दि. २५.११.२०२० रोजी सादर केलेल्या अहवालानुसार सदर बँकेच्या सन २००७-०८ मधील लेखापरिक्षण अहवालात कृषी थकबाकीची रक्कम रु. ८.५४ लाख दर्शविण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात या बँकेला कर्जमाफी योजनेंतर्गत राज्य शासनाकडून रु. ६६.९४ लाख व केंद्र शासनाकडून रु. १६८.१६ लाख असे एकूण १७२२ सभासदांकरीता एकूण रु. २३४.१० लाख रक्कम प्राप्त झालेली आहे. सदर चौकशी समितीस बँकेकडून मुळ कर्ज प्रकरणाची कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध न झाल्याने चौकशी समितीस अंतिम निष्कर्षावर येता आले नाही.

त्यानंतर जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ बुलढाणा यांच्या दि. १०.१२.२०२५ रोजीच्या पत्रात बँकेच्या सन २००७-२००८, २००८-२००९ व २००९-२०१० या कालावधीतील लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेली थकीत शेती कर्जाची माहिती प्रत्यक्षात मिळालेल्या कर्ज माफीच्या रकमांशी दिलेली आकडेवारी जुळत नसल्याचे दिसून आले आहे.

सन २००८ च्या केंद्र शासनाच्या कर्जमाफी योजनेची रक्कम नागरी सहकार बँकांच्या बाबीतीत भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत थेट संबंधित बँकांना वितरीत करण्यात आली असल्यामुळे या प्रकरणाची वस्तुस्थिती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आणण्यात येईल.

(६) व (७) हे खरे आहे.

श्रीमती श्वेता महाले, विधान सभा सदस्य यांच्या दि. १४.१२.२०२० व १७.०९.२०२१ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दि. ०६.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने चौकशी पथकाची नियुक्ती केली आहे. तथापि, सदर चौकशी आदेशाविरुध्द बँकेने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रमांक ५३८४/२०२१ दाखल केली आहे. सदर याचिकेत मा. न्यायालयाने दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्त पुणे यांच्या आदेशास स्थगिती दिली आहे. सदर स्थगिती उठविण्याबाबत विभागामार्फत मा. न्यायालयास विनंती अर्ज सादर करण्यात येईल.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ कर्ज योजने संदर्भात उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांच्या दि. ०२.०६.२०२६ रोजीच्या चौकशी अहवालानुसार कर्जदार यांनी GST क्रमांक व गत ३ वर्षाचे Turn Over बाबतचे C.A. प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले नाही असे कर्जदार दोषी असल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित कर्जदार यांच्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच अनुराधा अर्बन को-ऑप बँकेने अण्णासाहेब पाटील मराठा कर्ज योजने संबंधीची प्रकरणे तपासणीसाठी उपलब्ध करुन न दिल्यामुळे नियमानुसार बँकेविरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा बेलोरा, वाघजाळी व रोहडा (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे रोहित्र बसविण्यात झालेला गैरव्यवहार

**(१६) * ३२८५० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बेलोरा, वाघजाळी आणि रोहडा (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे महावितरण विभागांतर्गत ग्रामीण भागात कार्यकारी अभियंत्यांच्या अधिकारात जुने ६३ केव्हीए (KVA) क्षमतेचे कार्यरत रोहित्र काढून त्या जागी विनापरवाना १०० केव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविण्यात आले असून ६३ केव्हीए क्षमतेचे मूळ ५ रोहित्र शासकीय गोदामात जमा केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रोहित्र बदलताना तांत्रिक मंजुरी, अंदाजपत्रक आणि वरिष्ठ कार्यालयाची पूर्वपरवानगी घेण्याची कायदेशीर जबाबदारी कार्यकारी अभियंत्यांची असताना त्यांनी या सर्व नियमांचे उल्लंघन करून परस्पर सदर रोहित्र बसविल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंत्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून १०० केव्हीए क्षमतेच्या ५ नवीन रोहित्रांची खुल्या बाजारात विक्री केल्याने शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करून शासकीय निधीचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मौजे वाघजाळी येथे ६३ के.व्ही.ए. रोहित्र क्षमतावाढ करुन १०० के. व्ही. ए. क्षमतेचा रोहित्र अंदाजपत्रक मंजूर करुन बसविण्यात आला असून सदर ६३ के. व्ही. ए. चा रोहित्र देखभाल व दुरुस्ती केंद्र, पुसद

येथे जमा करण्यात आला आहे. मौजे बेलोरा व रोहडा येथे कोणत्याही रोहित्राचे क्षमतावाढ करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि अशा आशयाची बातमी दि. २४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.

(३) हे खरे नाही.

सदर बाबतीत वर्तमान पत्रातील तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाने चौकशी समिती गठीत करुन चौकशी केली असता चौकशी अंती कोणीही दोषी आढळले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील सेंट्रल एव्हेन्यू मेट्रो स्टेशन व रेशीमबाग परिसरात स्फोटकांचा साठा सापडल्याबाबत

**(१७) * ३२८३३ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील सेंट्रल एव्हेन्यू मेट्रो स्टेशनजवळ एका बेवारस बॅगेत १५ जिलेटीनच्या कांड्या, ५८ डिटोनेटर्स आणि ८ कनेक्टर्स असे मोठ्या प्रमाणावर स्फोटक साहित्य सापडल्याची तसेच रेशीमबाग येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापासून अवघ्या ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या एका कॉलेज प्राचार्यांच्या बागेत सुमारे २ किलो वजनाची जिवंत स्फोटके आढळून आल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेंट्रल एव्हेन्यू मेट्रो स्टेशनजवळील स्फोटक साहित्य तिथे गेल्या दीड महिन्यापासून पडून असल्याचे व प्राचार्यांच्या बागेत जप्त करण्यात आलेल्या स्फोटक साहित्यावरील मार्किंग व बारकोडच्या आधारे ते काटोल येथील स्फोटक युनिटमधून आले असल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेट्रो स्टेशन आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय यांसारख्या अतिसंवेदनशील ठिकाणांपासून हा परिसर अवघ्या ५०० मीटर ते दीड किलोमीटरच्या परिघात असताना, इतका मोठा स्फोटकांचा साठा इतक्या प्रदीर्घ काळापासून पोलिसांच्या किंवा गुप्तचर यंत्रणांच्या निदर्शनास का आला नाही,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर तपास एटीएस किंवा विशेष गुन्हे शाखेकडे सोपवून संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह प्रमुख शहरांमधील सार्वजनिक ठिकाणांच्या सुरक्षेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपुरमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबाग येथील मुख्यालयापासून ०५ कि.मी. अंतर असलेल्या सेंट्रल एव्हेन्यू मेट्रो स्टेशनजवळील परिसरात दि.०७/०४/२०२६ रोजी संशयास्पद वस्तू बाबत डायल ११२ वरून फिर्यादिमार्फत पोलीसांना माहिती प्राप्त झाली. त्यानंतर पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावून पाहणी केली असता संशयास्पद वस्तू दिसून आल्याने बि.डी.डी.एस. पथक तसेच न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा पथक यांच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी केली.

घटनास्थळावर खालीलप्रमाणे वस्तू आढळून आल्या आहेत.

१) NEOGEL ९०१ EMUSLSION EXPOLSIVE १२५ g SBL Energy Limited १५ नग

२) लाल रंगाची क्लिप लागलेले डिटोनेटर ०८ नग

३) खुले डिटोनेटर ५० नग

(२) व (३) सेंट्रल एव्हेन्यू मेट्रो स्टेशनजवळ आढळून आलेले स्फोटक साहित्य हे अंदाजे दीड महिन्यांपासून सदर ठिकाणी पडून असावे, अशी शक्यता फिर्यादी यांनी व्यक्त केली आहे. सदर स्फोटक साहित्यावर "एस.बी.एल. एनर्जी लिमिटेड, गाव ऐनवेरा, पोस्ट राहुलगाव, तहसील काटोल, पोलीस ठाणे कळमेश्वर, नागपूर" असे नमूद असलेले स्टिकर आढळून आले आहे. तथापि, तपासादरम्यान संबंधित कंपनीने मिळून आलेले स्फोटक साहित्य हे त्यांच्या कंपनीचे नसल्याचे सांगीतले आहे.

स्फोटके ज्या ठिकाणी आढळून आली ती जागा सार्वजनिक असून तेथे स्फोटक साहित्य हे झाडे झुडपे असलेल्या कुंपणाच्या आतील भागात पडून असल्यामुळे ते स्थानिक नागरिक, पोलीस अथवा गुप्तचर यंत्रणांच्या निदर्शनास आले नाही व त्या ठिकाणाबाबत कोणताही संशय निर्माण झाला नाही.

(४) सदर प्रकरणी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अप.क्रमांक १०४/२६ कलम २८८ भा.न्या.स. सहकलम ४, ५, स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा तपास सुरु आहे. सदर गुन्हयाच्या चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सी.ओ.सी यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून जास्तीत जास्त सार्वजनिक परिसरात सी.सी.टीव्ही कॅमेरे लावण्यात यावे याबाबत पत्र देण्यात आले आहे. तसेच सुरक्षा व सतर्कतेच्या दुष्टिने परिसरात पोलीस गस्तीचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नायगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील मीठ उत्पादनावर प्रदुषणाचा परिणाम होत असल्याबाबत**

**(१८) * ३८९४४ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील मीठ उत्पादनावर प्रदुषणाचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील २ ते ४ वर्षांपासून मिठागरांच्या आजूबाजूच्या परिसरातील सांडपाणी थेट मिठागरात सोडण्यात येत असल्यामुळे त्याचा परिणाम मीठ उत्पन्नावर होत असल्याने अनेक उत्पादकांनी व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिठाला इतर राज्यात मागणी असल्यामुळे नायगाव पूर्वेतील अनेक मिठागरांत मोठ्या प्रमाणात मीठ उत्पादन होत असताना सद्यस्थितीत मिठागरांच्या गुणवत्तेमुळे मिठाची मागणी घटल्याने पारंपरिक उपजीविकेवर अवलंबून असलेल्या कुटुंबासमोर आर्थिक संकट उद्भवले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने पारंपरिक मीठ उत्पादन सुरळीत चालू राहण्याबाबत तसेच परिसरातील सांडपाण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

अधीक्षक, मीठ उपायुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मिठागरांच्या आजूबाजूच्या परिसरातील सांडपाणी थेट मिठागरात सोडण्यात येत नाही. तथापि, मिठागरांच्या आजूबाजूच्या परिसरातील सांडपाणी खाडीत मिसळत असून त्याच पाण्याचा मिठागरासाठी पुरवठा केला जात असल्याने मीठ उत्पादनावर परिणाम होत आहे. परंतु, यामुळे पारंपरिक उपजीविकेवर अवलंबून असलेल्या कुटुंबासमोर आर्थिक संकट उद्भवले असल्याबाबतची माहिती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले आहे.

(४) वसई विरार महानगरपालिकेमार्फत सांडपाण्यावर पुरेशी प्रक्रिया होत नसल्याने मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी मूळ याचिका क्र.३२/२०२१ या प्रकरणी दि.०३.०५.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशांनुसार एकूण रक्कम रू.१८४.६२६ कोटी पर्यावरण भरपाई भरणा करण्यासंबंधी आदेश दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.१८.०७.२०२३ रोजी वसई विरार महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले होते. सदर आदेशाविरुद्ध वसई विरार महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालय येथे अपील दाखल केले असून मा.न्यायालयाने दि.१२.१२.२०२३ रोजी सदर प्रकरणी अंतरिम स्थगन आदेश दिलेले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतून एकूण २७२ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्याची निर्मिती होते. सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत ३० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यरत आहे. तसेच ५१ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर छोटे गृहसंकुलांद्वारे खाजगी प्रक्रिया केंद्रांद्वारे प्रक्रिया करण्यात येते. उर्वरित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता अमृत २.० योजनेंतर्गत नालासोपारा येथे १०३ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम सुरू आहे. तसेच नगरोत्थान योजनेंतर्गत एकूण ८१.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून एकूण ३७ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेकडे नायगाव परिसरात सद्यस्थितीत सांडपाणी संकलन व सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अस्तित्वात नाही. तथापि, नायगाव/ नवघर (झोन ६) येथे ४७ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या रु.४९६.५६ कोटी इतक्या रकमेच्या प्रकल्पास तसेच नालासोपारा (झोन ४) येथे ३४.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या एकूण रक्कम रू.३२१.८८ कोटी इतक्या रकमेच्या प्रकल्पास दि.२६.०८.२०२५ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंहगड रोड (जि.पुणे) येथे शेअर बाजारातील गुंतवणूक व बनावट सोने तारण प्रकरणांत झालेली फसवणूक

**(१९)** * **३७३४० श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड रोड (जि.पुणे) येथे शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या आमिषाने नागरिकांची तसेच बनावट सोने तारण ठेवून राष्ट्रीयकृत बँकेची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेअर बाजारातील गुंतवणुकीवर जादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीयकृत बँकांमध्ये बनावट सोने तारण ठेवून खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे कर्ज मंजूर करून आर्थिक फसवणूक करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन आर्थिक गुन्हे शाखेमार्फत संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह ऑनलाईन गुंतवणूक, शेअर मार्केट फसवणूक व बनावट तारण प्रकरणांपासून संरक्षण करण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम तसेच राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका व वित्तीय संस्थांमध्ये तारण पडताळणी प्रक्रिया सक्षम करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बनावट सोने तारण ठेवून राष्ट्रीयकृत बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी पर्वती पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १६०/२०२६ भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१६(२), ३१६ (५), ३१८(४), ६१(२) व ३(५) अन्वये दि. १८/०५/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) अशा प्रकारचा गुन्हा दाखल नाही.
(३) या राष्ट्रीयकृत बँकेत सोने तारणसाठी व्हॅल्युअर म्हणुन काम करीत असलेल्या या प्रकरणातील आरोपींनी कमी शुध्दतेचे/बनावट सोने तारण ठेऊन घेतले व ते सोने उच्च शुद्धतेचे सोने असल्याचे खोटे मूल्यांकन प्रमाणपत्र देऊन राष्ट्रीयकृत बँकेकडून संबंधितांना कर्ज घेण्यास मदत केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणात १३ कर्जदारांच्या २८ कर्ज प्रकरणांमध्ये राष्ट्रीयकृत बँकेची रू.४,२३,०४,७५२/- फसवणूक झाल्याचे आढळून आले आहे.
(४) याप्रकरणी बँकेला फसवून बनावट/कमी शुद्धतेच्या सोन्याच्या आधारे कर्ज घेतलेल्या सर्व १३ कर्जदारांना व त्यांना या कामी मदत करणाऱ्या २ व्हॅल्युअर अशा एकूण १५ जणांना आरोपी करण्यात आले आहे. तसेच मुख्य आरोपीस अटक करण्यात आली आहे व इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

राज्यामध्ये आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासाठी प्रत्येक पोलीस घटकात १ याप्रमाणे ४९ Financial Intelligence Unit (FIU) ची स्थापना करण्यात आलेली आहे. या FIU च्या माध्यमातून भविष्यात होऊ शकणाऱ्या आर्थिक गुन्ह्यांबाबत गोपनीय माहिती संकलित केली जाते. समाजामध्ये आर्थिक फसवणुकीच्या अनुषंगाने दिल्या जाणाऱ्या जाहिरातीच्या अनुषंगाने FIU च्या माध्यमातून प्राप्त माहितीच्या आधारे जनजागृती केली जाते.

राज्य शासनाने सायबर फसवणूकीला आळा घालण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला असून त्याअंतर्गत राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/पोलीस ठाणे अत्याधुनिक तांत्रिक सुविधांसह कार्यरत आहेत.

तसेच सायबर गुन्ह्यांच्या प्रभावी तपासासाठी कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना फॉरेन्सिक साधनांचे ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येते. सायबर गुन्हे प्रतिबंधासाठी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून राज्यव्यापी सायबर जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.www.cybercrime.gov.in वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० वर तात्काळ तक्रार दाखल करण्याबाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या विविध सोशल मिडीया अकांउटद्वारे जनजागृती करण्यात येत असून सोशल मीडिया मॉनिटरिंग युनिटमार्फत आक्षेपार्ह मजकुरावर सतत देखरेख व आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) दि. ०६/०६/२०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सहकारी बँका व वित्तीय संस्थांमार्फत तारण पडताळणी प्रक्रिया सक्षम करण्यासाठी ग्राहकांची KYC पडताळणी, तारणाच्या शुद्धता व वजनाची अधिकृत मूल्यमापकामार्फत तपासणी, अधिकृत मूल्यमापकाची नेमणूक करताना नमूद प्रक्रियेचे पालन करणे, आवश्यक कागदपत्रांची छाननी, अंतर्गत नियंत्रण व जोखीम व्यवस्थापन बळकट करणे,

संशयास्पद व्यवहारांवर देखरेख ठेवणे तसेच पारदर्शक लिलाव प्रक्रिया यांसंबंधी तरतुदी करण्यात आल्या असून, संबंधित विनियमित संस्थांकडून सदर सूचनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग मुलांसाठी असलेली अध्ययन अक्षमता केंद्र तज्ञांच्या अभावामुळे बंद असल्याबाबत

**(२०) * ३५१३८ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग मुलांसाठी महत्वाची असलेली ३८ पैकी २३ अध्ययन अक्षमता केंद्र तज्ज्ञांच्या अभावामुळे बंद पडल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त केंद्रातील मानसशास्त्रज्ञ, विशेष शिक्षक आणि ऑडिओलॉजिस्ट यांसारख्या तज्ज्ञांची पदे रिक्त असल्याने तसेच त्यांच्या मानधनात वाढ न झाल्याने अनेक तज्ज्ञांनी राजीनामा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर केंद्र बंद असल्याने अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती आणि आरक्षणाचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक असणारे अपंगत्व प्रमाणपत्र मिळणे कठीण झाल्याने शिक्षण व नोकरीच्या संधींवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उच्च न्यायालयाने दिलेले आदेश आणि शासनाने सन २०१८ मध्ये ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दिलासा देण्यासाठी सुरू केलेल्या या केंद्रांच्या कामकाजाकडे प्रशासकीय दुर्लक्ष झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर रिक्त पदे भरून ही केंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी असलेली १९ अध्ययन अक्षमता केंद्रे सुरु करण्यात आली होती परंतू यापैकी बरीचशी जिल्हा रुग्णालये वैद्यकीय महाविद्यालयांसाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास हस्तांतरित करण्यात आली असून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारित असलेल्या केंद्रांपैकी धुळे, यवतमाळ व लातूर येथील अध्ययन अक्षमता केंद्र तज्ञांच्या अभावी बंद आहेत.
(२) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी मानसोपचार तज्ञ, मानसशास्त्रज्ञ, कान, नाक व घसा तज्ञ, ऑडिओलॉजिस्ट, स्पीच थेरपिस्ट इ. उपलब्ध तज्ञांकडून दिव्यांगांची तपासणी व मुल्यमापन करुन दिव्यांग प्रमाणपत्रे वितरित करण्यात येत आहेत.
(३) हे खरे नाही.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत अधिसूचित २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाबाबत शासन निर्णय १४.०९.२०१८ नुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व नगर विकास

विभाग यांच्या अधिनस्त वैद्यकीय मंडळांकडून दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात येते. धुळे व यवतमाळ येथे सदर प्रमाणपत्राकरिता रुग्णांना जिल्हा रुग्णालयात संदर्भित करण्यात येते व त्यांच्या अवहलानुसार रुग्णास प्रमाणपत्र वितरित करण्यात येते. लातूर येथे मानसशास्त्रज्ञ हे पद प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या मार्फत प्रमाणपत्र वितरित करण्यात येते जेणेकरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ वाशी नवी मुंबईचे विभागीय अध्यक्ष आणि भंडार शाखा प्रमुख यांना लाच घेताना अटक केल्याबाबत**

**(२१)** * **३३४८२ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी नवी मुंबई या कार्यालयातील विद्युत उपकरणे देखभाल व दुरुस्ती करणेकरिता दिनांक १ सप्टेंबर, २०२५ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ या कालावधीतील एक वर्षाचे कंत्राट कंत्रादारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामाच्या बिलापोटी मंडळाचे विभागीय अध्यक्ष श्री.राजेंद्र अहिरे आणि भंडार शाखा प्रमुख श्री.मनोहर पवार यांनी कंत्राटदाराकडून सात टक्के कमिशन मागितले असून त्यांना वीस हजाराची लाच घेताना दिनांक ७ एप्रिल, २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक, ठाणे यांनी अटक केल्याचे दिनांक ३ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कार्यालयात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहाराचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाचेची मागणी करून ती स्विकारल्याप्रकरणी अटक करण्यात आलेली आहे.
(३) व (४) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई यांनी लाच रकमेची मागणी करून ती स्विकारल्याने त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ व १२ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पोलीस स्टेशन वाशी, नवी मुंबई येथे गु.र.क्र.०१८४/२०२६, दि.०८.०४.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उक्त गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांना शासन आदेश दि. २७.०५.२०२६ अन्वये अटकेच्या दिनांकापासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, सदर प्रकरणी त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील कॅफेमध्ये अवैधरित्या सुरू असलेली हुक्का विक्री व सेवन

**(२२) * ३३८१५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात अनेक कॅफेच्या आड हुक्का पार्लर्सचा अवैध व्यवसाय सुरु असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील चार कॅफेवर पोलीसांनी कारवाई केली असून १०६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह हुक्का पार्लर्सवर बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये राज्य शासनाने सन २०१८ मध्ये सुधारणा करून दिनांक ०४.१०.२०१८ पासून राज्यामध्ये हुक्का बारवर बंदी घातली आहे.

तथापि, नागपूर शहरात दोन कॅफे, एक सलून व एक हुक्का बार मध्ये अवैधरित्या हुक्का विक्री व सेवन करत असल्याचे आढळून आल्याने मे, २०२६ मध्ये कपिलनगर पोलीस ठाणे येथे ५ गुन्हे, सदर पोलीस ठाणे येथे २ गुन्हे व जरीपटका पोलीस ठाणे येथे १ गुन्हा असे एकूण ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यात एकूण २६ आरोपी असून, त्यामध्ये एकूण रू. १,६०,३४७/- इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर ८ गुन्ह्यांपैकी २ गुन्ह्यात मा. न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले असून, उर्वरित ६ गुन्ह्यांमध्ये पोलीस तपास सुरू आहे.

नागपूर शहरातील सर्व पोलीस ठाणे येथे पोलीस काकांमार्फत हुक्का सेवनाचे दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात येते. याबाबत Operation Thunder अंतर्गत मागील दोन वर्षात जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, क्रीडा उपक्रम, रॅली, पथनाट्य, समुपदेशन, विविध स्पर्धा, सोशल मिडीया इ. च्या माध्यमातून नागरिकांची जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.